# महाराष्ट्र विधानपरिषद

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम

## गुरूवार, दिनांक १२ मार्च, २०२६

## (सकाळी १०-०० ते ११-४५ वाजता)

(क) **अर्धा-तास चर्चा म.वि.प. नियम ९२ अन्वये —**

**(मंगळवार, दिनांक २४ फेब्रुवारी, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली परंतु प्रलंबित असलेली अर्धा-तास चर्चेची सूचना) [अनुक्रमांक १]**

(१) **सर्वश्री विक्रम काळे, अमोल मिटकरी, शिवाजीराव गर्जे, वि.प.स.**

"**राज्यातील शाळांना सन २०२४-२५ या वर्षाची पटसंख्या ग्राह्य धरून अनुदान मिळणेबाबत**" या विषयावरील **श्री. ज्ञानेश्वर म्हात्रे, वि.प.स. यांचा** तारांकित प्रश्न क्रमांक ५३२३ ला दिनांक ८ डिसेंबर, २०२५ रोजी दिलेल्या उत्तरातून उद्भवणाऱ्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

**(बुधवार, दिनांक २५ फेब्रुवारी, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली परंतु प्रलंबित असलेली अर्धा-तास चर्चेची सूचना) [अनुक्रमांक २]**

(२) **सर्वश्री सत्यजीत तांबे, विक्रम काळे, किशोर दराडे, वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"राज्याच्या कृषी व सिंचन व्यवस्थेचा आरसा असलेला 'आर्थिक पाहणी अहवाल' गेल्या १४ वर्षांपासून अपूर्ण माहितीच्या आधारे प्रसिद्ध होत आहे, ही बाब राज्याच्या प्रगतीसाठी अत्यंत भूषणावह नाही, सिंचनाखालील क्षेत्राची अद्ययावत आकडेवारी उपलब्ध नसल्यामुळे राज्याचा नेमका सिंचन अनुशेष किती आहे आणि तो दूर करण्यासाठी कोणत्या उपाययोजना कराव्यात, याबाबत धोरणात्मक निर्णय घेणे कठीण झाले असणे, या प्रकरणात जिल्हाधिकारी कार्यालय आणि कृषी आयुक्तालयातील संबंधित शासकीय अधिकारी व यंत्रणेने माहिती संकलनाबाबत कमालीचा निष्काळजीपणा व दुर्लक्ष केल्याचे स्पष्टपणे दिसून येत असणे, कारण अनेक जिल्ह्यांची माहितीच प्राप्त झालेली नसणे, अद्ययावत माहितीअभावी सिंचन प्रकल्पांसाठी नियोजित केलेल्या शासकीय निधीचा विनियोग करताना तांत्रिक पेच निर्माण होत असून, यामुळे शेतकरी व समाजावर विपरीत परिणाम होत असणे, तरी शासनाने सदर माहिती तातडीने संकलित करून अहवालात समाविष्ट करावी, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(गुरुवार, दिनांक २६ फेब्रुवारी, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या परंतु प्रलंबित असलेल्या अर्धा-तास चर्चेच्या सूचना) [अनुक्रमांक ३ व ४]**

(३) **सर्वश्री सतेज उर्फ बंटी पाटील, अशोक उर्फ भाई जगताप, जयंत आसगावकर, वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील**.

"सावंतवाडी, दोडामार्ग, वेंगुर्ले (जि.सिंधुदूर्ग) तालुक्यांमध्ये डेव्हलपमेंट झोन येणार असल्याने शासन जमिनी संपादीत करणार असल्याचे सांगुन स्थानिक शेतकरी व बागायतदारांकडून त्यांच्या मोक्याच्या जमिनी नाममात्र दराने विकत घेतल्या जात असल्याचे प्रकार वाढत असून यामध्ये येथील काही मध्यस्थ व परप्रांतीय गुंतवणूकदार सक्रीय झाले असणे, यामुळे येथील स्थानिक शेतकरी व बागायतदार भूमिहीन होत असल्याने गाव सोडून जात असणे, याबाबत शासनाने तातडीने माहिती घेवून येथील मध्यस्थ व परप्रांतीय गुंतवणूकदार तसेच त्यांच्याशी संगनमत करणारे संबंधित शासकीय अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कठोर कारवाई करण्याची गरज असणे व स्थानिक शेतकऱ्यांना भूमिहीन होण्यापासून रोखण्याची आवश्यकता असणे याकरीता शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(४) **सर्वश्री अमोल मिटकरी, विक्रम काळे, सतिश चव्हाण वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील**.

"राज्यातील वातावरणातील हवामान बदलांमुळे तसेच पाऊसाच्या अनियमिततेमुळे शेतीवर विपरित परिणाम होत असल्याने पिकांच्या उत्पादकतेमध्ये घट होऊन उत्पादनांचा दर्जादेखील खालावत असणे, त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत असणे, राज्यात मागील काही वर्षांत अतिवृष्टी तसेच पुरांमुळे लाखो हेक्टर क्षेत्रावरील पिकांचे नुकसान झालेले असणे, त्याचप्रमाणे शेतजमीन, विहीर, शेततळी आणि पशुधनाच्या नुकसानीसह जिवित व वित्तहानी झालेली असणे, हवामानातील बदलामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला असणे, जागतिक तापमान वाढीच्या परिणामाचा सर्वाधिक फटका शेतकऱ्यांना सोसावा लागत असल्याने या संपूर्ण बाबींचा विचार करतां नैसर्गिक संकटांवर मात करीत असतांना अन्य उपायांसोबत कृषी संशोधनाची दिशा बदलण्याची गरज असणे याकरीता शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना"

**(बुधवार, दिनांक ४ मार्च, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या परंतु प्रलंबित असलेल्या अर्धा-तास चर्चेच्या सूचना) [अनुक्रमांक ५ व ६]**

**(५) सर्वश्री संजय खोडके, विक्रम काळे, अमोल मिटकरी, वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"राज्य शासनाकडून शेतकऱ्यांकडील सोयाबीन हमीभावाने (MSP) खरेदी करण्यासाठी आखण्यात आलेले धोरण अंमलात आणताना विविध प्रशासकीय व कार्यात्मक अडचणी निर्माण होत असल्याचे निदर्शनास येत असणे, विशेषतः सोयाबीनचे उत्पादन बाजारात येण्याच्या कालावधीत तात्काळ खरेदी सुरू करणे आवश्यक असताना अनेक ठिकाणी MSP खरेदी केंद्रे वेळेवर सुरू न होता उशिरा सुरू केली असणे, परिणामी, शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनाची वेळेवर विक्री करता येत नसणे, गरजेनुसार खरेदी केंद्रांची संख्या निश्चित न करणे, खरेदी कालावधीबाबत स्पष्ट व पूर्वनियोजित वेळापत्रक जाहीर न करणे, तसेच प्रशासनाकडील परवानगी प्रक्रिया, मंजुरीतील विलंब आणि धोरणात्मक अनिश्चितता यांमुळे खरेदी केंद्रे वेळेवर सुरू करण्यात अडथळे येत असणे, काही केंद्रांवर सोयाबीनच्या आर्द्रता टक्केवारी व गुणवत्ता (FAQ Standard) संदर्भातील निकषांमुळेही खरेदी प्रक्रियेत अडचणी निर्माण होत असणे, तसेच काही प्रकरणांमध्ये शेतकऱ्यांकडे सोयाबीन शिल्लक असतानादेखील खरेदी केंद्रे अकाली बंद करण्यात आल्यामुळे शेतकऱ्यांना हमीभावाने विक्रीची संधी मिळत नसणे, त्यामुळे शेतकऱ्यांना कमी दराने खुल्या बाजारात विक्री करावी लागत असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(६) श्रीमती उमा खापरे, सर्वश्री प्रविण दरेकर, प्रसाद लाड, वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"राज्यातील शासकीय, निमशासकीय तसेच मान्यता प्राप्त खाजगी अंशतः अनुदानित, विनाअनुदानित व १०० टक्के अनुदानित शैक्षणिक संस्थांमध्ये दिनांक १ नोव्हेंबर, २००५ पूर्वी नियुक्त होऊन नंतर १०० टक्के अनुदानावर आलेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना जुनी निवृत्तीवेतन योजना (OPS) लागू करावी, याबाबत विविध शिक्षक संघटना शासनाकडे वारंवार निवेदने सादर करीत असून याबाबत मा.सर्वोच्च न्यायालय यांनी निर्देश दिलेले असूनही शासनाने अद्याप अंतिम निर्णय जाहीर केलेला नसणे, शासकीय, निमशासकीय, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या समन्वय समितीच्या नेतृत्वाखाली राज्यातील सुमारे १७ लाख कर्मचारी व शिक्षक दिनांक १४ मार्च ते २० मार्च, २०२३ या कालावधीत बेमुदत संप पुकारलेला असणे, त्यानंतर माजी मुख्य सचिव श्री.सुबोध कुमार यांच्या अध्यक्षतेखाली अभ्यास समिती नियुक्त करुन उक्त समितीस दिनांक १४ जून, २०२३ पर्यंत तीन महिन्यांची मुदत देण्यात आली असणे, याच अनुषंगाने जुनी पेन्शन समन्वय संघाच्या नेतृत्वाखाली दिनांक ३ मे, २०२३ पासून आझाद मैदान येथे बेमुदत आंदोलन सुरू असून दिनांक १ नोव्हेंबर, २००५ पूर्वी अनुदानित, विनाअनुदानित किंवा अंशतः अनुदानित शैक्षणिक संस्था, वस्ती शाळा तसेच इतर विभागांमध्ये जनसेवक म्हणून नियुक्त झालेल्या

शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या एकूण संख्येची अद्ययावत माहिती उपलब्ध करून देणे आवश्यक असणे, तसेच, दिनांक १ नोव्हेंबर, २००५ पूर्वी सेवेत असलेल्या अनेक शिक्षकांची जीपीएफ खाती सुरू असली तरी त्यामध्ये हप्त्यांची कपात सध्या होत नसणे, सन २००५ नंतर शासनाने शासकीय, निमशासकीय सेवा तसेच नगरपालिका, महानगरपालिका व इतर अनुदानित शाळांमधील सुमारे १६,१०,००० शासकीय कर्मचारी व सुमारे ७,००,००० मान्यताप्राप्त शिक्षक/कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू न करता नवीन निवृत्तीवेतन योजना (NPS) लागू केलेली असणे, डीसीपीएसमधील (DCPS) जमा रक्कम अद्याप एनपीएसमध्ये वर्ग झालेली नसल्याने संबंधित कर्मचाऱ्यांना अचूक आर्थिक तपशील उपलब्ध होत नसणे, काही कर्मचाऱ्यांची एनपीएस खाती अद्याप सुरू झालेली नसल्याची बाब निदर्शनास येणे, नगरपालिका व महानगरपालिका शाळांतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे सहावा व सातवा वेतन आयोगाचे हप्ते प्रलंबित असल्याच्या तक्रारी असणे, विभागाच्या शासन निर्णयानुसार दिनांक १ नोव्हेंबर, २००५ रोजी व त्यानंतर राज्यातील जिल्हा परिषद तसेच मान्यता प्राप्त खाजगी १००% अनुदानित प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक व अध्यापक विद्यालयांतील १००% अनुदानित पदावरील शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी, जे परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना (DCPS/NPS) सदस्य आहेत, त्यांचा सेवेत असताना मृत्यू झाल्यास त्यांच्या कुटुंबास कुटुंब निवृत्तीवेतन व मृत्यू उपदान तसेच रुग्णतेमुळे सेवानिवृत्त झाल्यास रुग्णता निवृत्तीवेतन व सेवानिवृत्ती उपदान देण्याबाबत Maharashtra Civil Services (Pension) Rules, 1982 मधील तरतुदीनुसार कुटुंब निवृत्तीवेतन व रुग्णता निवृत्तीवेतन लागू करण्याचा विषय शासनाच्या विचाराधीन असणे, उक्त प्रकरणी शासनाने सविस्तर चौकशी करुन समितीच्या अहवालातील शिफारशींनुसार दिनांक १ नोव्हेंबर, २००५ पूर्वी व त्यानंतर नियुक्त शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना जुनी निवृत्तीवेतन योजना लागू करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(गुरुवार, दिनांक ५ मार्च, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या परंतु प्रलंबित असलेल्या अर्धा-तास चर्चेच्या सूचना) [अनुक्रमांक ७ व ८]**

(७) **श्री. सुनिल शिंदे, ॲड. अनिल परब, श्री. जगन्नाथ अभ्यंकर, वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"वातावरणातील बदल आणि तापमान वाढीमुळे मुंबई शहरासह कोकण किनारपट्टीचा परिसर पाण्याखाली जाणे, तसेच राज्यात दुष्काळ व अतिवृष्टीची तीव्रता वाढण्याबाबत पर्यावरण विभागाने वर्तविलेली भिती लक्षात घेता राज्य मंत्रिमंडळाने दिनांक १ सप्टेंबर, २०२१ रोजीच्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार मा. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली "राज्य वातावरणीय बदल परिषद"

दिनांक २६ नोव्हेंबर, २०२१ रोजीच्या शासन निर्णयाव्दारे गठीत करण्यात आलेली असणे, "मुंबई फर्स्ट" या संस्थेने मा. मुख्यमंत्री महोदयांना दिनांक १ सप्टेंबर, २०२१ रोजी पाठविलेल्या पत्रात वातावरणीय बदलांमुळे निर्माण होणा-या संभाव्य समस्यांचा सामना करण्यासाठी ठोस आराखडयाची गरज असून त्यासाठी काही उपाययोजना सुचविल्या असणे, तद्नुसार शासनाने ठोस निर्णय घेवून त्यांची अंमलबजावणी करण्याची नितांत आवश्यकता असणे, संयुक्त राष्ट्राच्या इंटर गव्हर्नमेंट पॅनल ऑन क्लायमेट चेंज (IPCC) ने माहे ऑगस्ट, २०२१ मध्ये प्रसिद्ध केलेल्या अहवालात कार्बन डायऑक्साईड व इतर हरितगृह वायूंच्या अमर्याद उत्सर्जनामुळे २१ व्या शतकात तापमानात १.५० सें ते २० सें ने वाढ होण्याची शक्यता वर्तविली असणे त्यामुळे समुद्र पृष्ठभागाच्या तापमानातही वाढ होऊन जागतिक पर्जन्य चक्रावरही परिणाम होणार असल्याचे सूचित केलेले असणे, मागील काही वर्षात मुंबईसह राज्यात अनेकदा आलेल्या नैसर्गिक आपत्तींचा विचार करता भविष्यात त्या टाळण्यासाठी संयुक्त राष्ट्राच्या इंटर गव्हर्नमेंट पॅनल ऑन क्लायमेट चेंज (IPCC) ने सादर केलेल्या अहवालानुसार शासनाकडून करण्यात येणारी कार्यवाही व उपाययोजना."

**(८) सर्वश्री शशिकांत शिंदे, एकनाथराव खडसे, अरुण लाड, वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील**.

"खेड (ता.जि.सातारा) येथील ग्रामपंचायतीमधील सरपंच व ग्रामविकास अधिकारी यांनी रुपये १६,६९,१४३/- ची अनियमितता व अपहार केल्याप्रकरणीचा चौकशी अहवाल चौकशी अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, सातारा यांनी दिनांक ६ मे, २०२५ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सातारा यांना सादर केलेला असणे, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सातारा यांनी दिनांक २७ जून, २०२५ रोजी फेर चौकशी समिती नेमलेली असणे, सदर चौकशी समितीने दिनांक ११ जुलै, २०२५ रोजी अहवाल सादर करुन त्यामध्ये ग्रामनिधीतील विकासकामांमध्ये रुपये ६,३६,५००/- ची आर्थिक अनियमितता व रुपये १०,४०६४३/- चा आर्थिक गैरव्यवहार झाल्याचे निष्पन्न झाले असणे, त्यानुषंगाने ग्रामविकास अधिकारी यांना सेवेतून निलंबित केले असणे व तत्कालीन शाखा अभियंता यांच्याविरुध्द विभागीय चौकशी प्रस्तावित असून विभागीय आयुक्त, पुणे विभाग यांचेकडे दिनांक ८ जानेवारी, २०२६ रोजी फेर अहवाल सादर करण्यात येऊन महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम कलम ३९ (१) नुसार सरपंच यांना अपात्र करणेबाबतची शिफारस करुनही अद्याप कोणतीच कार्यवाही झालेली नसणे, या प्रकरणी संबंधित दोषींवर कारवाई करण्याकरिता शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(सोमवार, दिनांक ९ मार्च, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या परंतु प्रलंबित असलेल्या अर्धा-तास चर्चेच्या सूचना) [अनुक्रमांक ९ व १०]**

(९) **श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील, ॲड. निरंजन डावखरे, श्री.शशिकांत शिंदे, वि.प.स पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील**.

"उजनी धरण हे राज्यातील एक महत्वाचे व विस्तीर्ण जलाशय असल्याने पर्यटकांना गोड्या पाण्याचा समुद्र अनुभवण्याची संधी मिळत असणे, दरवर्षी येणाऱ्या विदेशी पक्ष्यांमुळे सदर ठिकाण पक्षी निरीक्षणासाठी विशेष प्रसिद्ध असणे, त्यामुळे इको-टुरिझम, बर्ड वॉचिंग, तसेच जलक्रीडा पर्यटन इ.बाबींचा विकास होऊ शकतो त्याअनुषंगाने जलपर्यटन केंद्र, बोट क्लब, वॉटर स्पोर्ट्स सुविधा, देशातील सर्वात मोठा जलतरण तलाव, धार्मिक पर्यटनासाठी सुविधा विकास, कृषी व विनयार्ड पर्यटनासाठी मार्गदर्शक केंद्रे, निवास व्यवस्था यासाठी रुपये २८२ कोटी एवढ्या रकमेचा उजनी एकात्मिक पर्यटन विकास प्रकल्प आराखडा शासनाने मंजूर केला असणे, सदर प्रकल्पासाठी सन २०२७ पर्यंतची मुदत निश्चित करण्यात येणे, तरी प्रत्यक्षात अंमलबजावणीस गती मिळालेली नसणे, उजनी जलाशय व परिसरातील काही जमिनींवर कृष्णा खोरे विकास महामंडळ यांनी करारासाठी हक्क सांगितल्याने जलपर्यटन केंद्रासाठी बोट खरेदीची निविदा रद्द करण्यात येणे, परिणामी पर्यटन प्रकल्पांचा विकास थांबला असून स्थानिक व्यावसायिक, युवक व नागरिकांमध्ये नाराजी निर्माण होणे, उजनी धरण येथे जल, कृषी, धार्मिक व विनयार्ड पर्यटन यांच्या एकत्रित स्वरूपामुळे स्थानिक रोजगारनिर्मिती, लघुउद्योगांना चालना, तसेच जिल्ह्याच्या आर्थिक विकासाला मोठी मदत होणार असून उजनी एकात्मिक पर्यटन प्रकल्पास गती देण्यासाठी संबंधित विभागांमध्ये समन्वय साधून प्रशासकीय अडथळे दूर करून निश्चित वेळेत उक्त प्रकल्पांची अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही वा उपाययोजना."

(१०) **सर्वश्री अभिजित वंजारी, सुधाकर अडबाले, अशोक उर्फ भाई जगताप, वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"नागपूर येथील कोराडी औष्णिक वीज केंद्रात ६६० मेगावॅट क्षमतेचे युनिट क्रमांक ८, ९, १० असे तीन युनिट सन २०१० ते २०१७ या कालावधीत उभारले असणे, या प्रकल्पांना केंद्रीय पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयांने दिनांक ४ जानेवारी, २०१० रोजी पर्यावरणीय मान्यता दिली असणे, परंतु या प्रकल्पासाठी केंद्रीय वने व हवामान बदल पर्यावरण मंत्रालयाने मंजूरी देताना विनिर्दिष्ट केलेल्या अटींचे पालन करण्यात महाजेनको अपयशी ठरणे, तसेच कोराडी प्रकल्पाला वातावरणातील हवेची गुणवत्ता राखण्यात अपयश आले असणे, १०० टक्के फ्लाय ॲश वापराचे उल्लंघन होणे, राख साठवण तलावात फ्लाय ॲश योग्यप्रकारे व्यवस्थापित न करणे, पर्यावरणीय नियमांचे उल्लंघन करणाऱ्या या

गंभीर कृत्यांमुळे राष्ट्रीय हरीत लवादाने महाजेनकोला ५ कोटी रूपयांचा दंड ठोठावला असणे महाजेनकोच्या निष्काळजीपणामुळे मोठ्या प्रमाणात प्रदुषण वाढल्यामुळे नागपूरातील हवेची गुणवत्ता खराब होऊन मानवी जीवनावर आरोग्य विषयक गंभीर परिणाम होणे याकरिता शासनाकडून करावयाची कार्यवाही व उपाययोजना"

**(मंगळवार, दिनांक १० मार्च, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या परंतु प्रलंबित असलेल्या अर्धा-तास चर्चेच्या सूचना) [अनुक्रमांक ११ व १२]**

**(११) श्रीमती उमा खापरे, सर्वश्री प्रविण दरेकर, प्रसाद लाड, वि.प.स.**

"**राज्यातील राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे आगार बी.ओ.टी. तत्वावर देण्याबाबत**" या विषयावरील **श्री. राजहंस सिंह, वि.प.स. यांचा** तारांकित प्रश्न क्रमांक १७४३ ला दिनांक १४ डिसेंबर, २०२५ रोजी दिलेल्या उत्तरातून उद्भवणाऱ्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

**(१२) सर्वश्री सत्यजीत तांबे, किशोर दराडे, विक्रम काळे, वि.प.स.**

"**मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षणार्थी योजना बंद केल्याबाबत**" या विषयावरील **डॉ. परिणय फुके व इतर वि.प.स.यांचा** तारांकित प्रश्न क्रमांक ५१३३ ला दिनांक १३ डिसेंबर, २०२५ रोजी दिलेल्या उत्तरातून उद्भवणाऱ्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

**(बुधवार, दिनांक ११ मार्च, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या परंतु प्रलंबित असलेल्या अर्धा-तास चर्चेच्या सूचना) [अनुक्रमांक १३ व १४]**

**(१३) डॉ. परिणय फुके, श्री. प्रविण दरेकर, ॲड. निरंजन डावखरे, वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"राज्यातील अनुसूचित जाती व नवबौद्ध समाजातील सुशिक्षित बेरोजगारांना स्वयंरोजगारासाठी अर्थसहाय्य देण्याच्या उद्देशाने महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ आणि संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार महामंडळांची स्थापना करण्यात आली असणे, मात्र सन २०१० पासून ८५ टक्के कर्जदारांची सुमारे ८०० कोटी रुपयांची थकबाकी प्रलंबित असल्याने या महामंडळास आर्थिक चक्र पूर्णपणे कोलमडले असून महामंडळे आर्थिकदृष्टया दुर्बल झाली असणे, तसेच वसुलीसाठी स्थापन केलेल्या प्रादेशिक वॉर रूम आणि संगणकीकृत मॉनिटरिंग प्रणालीचा परिणाम दिसून येत नसणे, प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे वसुलीची गती मंदावली असणे, यामुळे नवीन पात्र लाभार्थ्यांसाठी कर्ज उपलब्ध करून देण्यास महामंडळे असमर्थ ठरत असून मागासवर्गीय युवकांच्या रोजगाराचा प्रश्न अधिक गंभीर झाला असणे, शासनाला पुन्हा ५७० कोटी रुपयांची नवीन शासकीय हमी

द्यावी लागत असणे, जो थेट शासकीय निधीचा अपव्यय असणे, शासन यंत्रणेने थकबाकी वसुलीसाठी ठोस धोरण राबवून महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ आणि संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार महामंडळ या महामंडळांना आर्थिक अडचणीतुन बाहेर काढणे आवश्यक असणे यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(१४) **सर्वश्री. प्रसाद लाड, प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"मुंबईत इमारतीच्या ३४ मजल्यापेक्षा जास्त उंचीवरील आग विझविण्याइतपत मुंबई अग्निशमन दलाची क्षमता नसतानाही १०० ते १२५ मजल्यांपर्यंत गगनचुंबी इमारतींचे प्रस्ताव मंजूर करून सर्वत्र इमारती निर्माण करण्यात येत असणे, अग्निशमन दलाने स्वतःच आपली मर्यादा यापूर्वी मान्य केलेली असतानाही या इमारतींना बृहन्मुंबई महानगरपालिका आणि अग्निशमन दलाची परवानगी देण्यात येत असल्याने प्रशासनात समन्वयाचा अभाव असणे, उक्त इमारतींमुळे एखादी आगीची घटना घडल्यास अग्निशमन दलाला अनेक समस्यांचा सामना करावा लागत असून नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण होत असणे, त्यामुळे मुंबईतील ३४ मजल्यांच्या वरील मजल्यांवर वास्तव्यास असणाऱ्या रहिवाशांना अग्नी सुरक्षा व इतर आपत्कालीन सुरक्षेपासून वंचित रहावे लागत असणे, त्यामुळे ३४ मजल्यांवरील सर्व इमारतींचे परवाने सार्वजनिक करण्याच्या दृष्टीने शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(ख) **(गुरुवार, दिनांक ५ मार्च, २०२६, सोमवार, दिनांक ९ मार्च, २०२६, मंगळवार, दिनांक १० मार्च, २०२६ व बुधवार, दिनांक ११ मार्च, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला प्रलंबित म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव) — (चर्चा पुढे सुरू व मंत्र्यांचे उत्तर)**

**श्री. सतेज उर्फ बंटी पाटील,** ॲड. अनिल परब, सर्वश्री शशिकांत शिंदे, अशोक ऊर्फ भाई जगताप, सुनिल शिंदे, एकनाथराव खडसे, अभिजित वंजारी, सचिन अहिर, अरुण लाड, राजेश राठोड, जगन्नाथ अभ्यंकर, जयंत आसगावकर, मिलिंद नार्वेकर, धीरज लिंगाडे, सुधाकर अडबाले, **म.वि.प. यांचा नियम २६० अन्वये प्रस्ताव —**

"राज्यातील नगरपालिका, महानगरपालिकेचा कारभार प्रशासनामार्फत गेले अनेक वर्ष चालविल्यामुळे वाढलेला गैरव्यवहार व नागरी सोयींचा उडालेला बोजवारा, विशेषत: मुंबई महानगरपालिकेत ८१ हजार ४४९ कोटी ३२ लाख रूपयांच्या ठेवी मोडून त्यापैकी ३६ हजार ६२३ कोटी रुपये विविध प्रकल्पांसाठी वापरण्यांचे निश्चित केल्याने त्यामध्ये झालेली अनियमितता, मुंबईची सर्वसामान्यांची लाईफलाईन असलेली बेस्ट बंद करण्याचा डाव असणे, विविध मेट्रो प्रकल्पाच्या बांधकामात झालेला गैरव्यवहार, एमएमआरडीए तसेच सिडको या प्राधिकरणांमध्ये वाढलेला गैरव्यवहार, त्यामुळे त्यांची ढासळलेली आर्थिक स्थिती, विविध शहरांचे विकास आराखडे व हद्दवाढीचे प्रस्ताव

रखडणे, मिठी नदी स्वच्छता व गाळ काढणे या निविदेत झालेली अनियमितता, तसेच नागपूर महानगरपालिकेत कंपोस्ट डेपो, रिंग रेल्वे, डम्पिंग यार्ड, इत्यादी कामात झालेली अनियमितता, एसटीपी प्रकल्प नसल्याने पाणी निचऱ्याचा प्रश्न ऐरणीवर येणे, मोठया प्रमाणात उड्डाण पूल तयार होऊनही वाहतूक कोंडी निर्माण होणे, तसेच निधी अभावी दुरुस्तीची कामे रखडलेली असणे, गृहनिर्माण धोरणाची अंमलबजावणी न होणे, एसआरए अंतर्गत झालेला भ्रष्टाचार, जुन्या मोडकळीस आलेल्या इमारतीचे धोरण निश्चित करणे, म्हाडाच्या लॉटरीमध्ये झालेला गैरव्यवहार, गिरणी माथाडी व सफाई कामगार व पोलीस कर्मचारी यांना हक्काची घरे प्राप्त न होणे, केंद्र सरकारच्या जमिनीवरील झोपडपट्टी व इमारतीबाबत धोरण ठरविणे, सार्वजनिक बांधकाम अंतर्गत राज्य महामार्ग व इतर रस्त्यांची तसेच अन्य कामे निधी अभावी रखडली असून ठेकेदारांना पुरेसा व वेळेवर निधी मिळत नसल्याने रस्त्याचा दर्जा निकृष्ट असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना ."

## (दुपारी १२-०० वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे**

**दोन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे —**

(१) **मुख्यमंत्री** : "लोक आयुक्त आणि उप लोक आयुक्त महाराष्ट्र राज्य यांचे सन २०२२ ते सन २०२४ या वर्षांचे अनुक्रमे पन्नासावा, एकावन्नवा व बावन्नवा वार्षिक एकत्रित अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

(२) **उच्च व तंत्रशिक्षण मंत्री** : "संजय घोडावत विद्यापीठ, कोल्हापूर यांचा सन २०२४-२०२५ या वर्षाचा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

(३) **उद्योग मंत्री** : **(क)** "पश्चिम महाराष्ट्र विकास महामंडळाचा सन २०२३-२०२४ या वर्षाचा त्रेपन्नवा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(ख)** "विदर्भ विकास महामंडळाचा सन २०२३-२०२४ या वर्षाचा त्रेपन्नवा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : अशासकीय विधेयके व ठराव समितीचे प्रतिवृत्त सादर करणे.**

**चार : (क) म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचना — (असल्यास)**

**(ख) म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचनांची निवेदने —**

(१) **श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक २९ वर मुख्यमंत्री निवेदन करतील :-**

मुंबईतील आयआयटी, पवई येथील वसतिगृहात जिवंत काडतुसे सापडल्याबाबत.

(२) **श्री.सचिन अहिर, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक २६ वर उप मुख्यमंत्री (नगरविकास) निवेदन करतील :-**

मुंबई महानगरपालिकेच्या अखत्यारितील गोवंडी येथील पंडीत मदनमोहन मालवीय शताब्दी रुग्णालय सार्वजनिक-खासगी भागीदारी तत्वावर चालविण्याच्या प्रस्तावाचा फेरविचार करण्याबाबत.

(३) **श्री.अभिजित वंजारी, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक २७ वर वैद्यकीय शिक्षण मंत्री निवेदन करतील :-**

नागपूर मधील शासकीय रुग्णालयात जळीत रुग्णांवर उपचाराची सोय नसल्याबाबत.

(४) **श्री.सत्यजीत तांबे, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक २८ वर शालेय शिक्षण मंत्री निवेदन करतील :-**

शिक्षण हक्क कायद्यांतर्गत (RTE) खासगी शाळांमधील १ किलोमीटर अट शिथिल करण्याबाबत.

(५) **श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक ३० वर परिवहन मंत्री निवेदन करतील :-**

राज्यात दिनांक ५ मार्च, २०२६ रोजीपासून वाहतूकदार संप करणार असल्याबाबत.

**पाच : लक्षवेधी सूचना — (म.वि.प. नियम १०१ अन्वये) —**

(१) **श्रीमती चित्रा वाघ, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"गोल्ड व्हॅल्युअर्स (सोनार) हे देशातील बँकिंग व्यवस्थेचा एक महत्त्वाचा घटक असणे, सुवर्ण कर्ज (Gold Loan) वितरण प्रक्रियेत अचूक,

पारदर्शक व जबाबदार मूल्यांकन करण्याची जबाबदारी ही पूर्णतः गोल्ड व्हॅल्युअर्सवर असणे, सोन्याच्या वाढत्या किंमती, जोखीम, फसवणूक प्रतिबंध, कायदेशीर जबाबदाऱ्या आणि बँकांच्या कठोर ऑडिट प्रक्रियेमुळे आज गोल्ड व्हॅल्यूएशनची जबाबदारी अनेक पटींनी वाढणे, RBI च्या निर्देशांची पायमल्ली करणे, गोल्ड व्हॅल्यूएशनची स्टँडर्ड ऑपरेटिव्ह प्रोसिजर बनवून व्हॅल्युअर्सना न देणे, कर्जदाराने आणलेल्या ऐवजाच्या मालकीची तपासणी न करणे, संशयास्पद ऐवजाच्या मालकीबद्दल शपथेवर प्रमाणपत्र न घेणे, KYC ची प्रभावी अंमलबजावणी न करणे, एवढ्या गोष्टींचे काटेकोर पालन केल्यास बँकांतून खोटे दागिने तारण ठेवण्याचे प्रमाण ९० टक्के कमी होणे, १० लाखाचे व्हॅल्यूएशन झाल्यास सोनाराला फक्त ३५० रुपये मिळणे, प्रचलित फी मध्ये सोने भाववाढ व जोखमीच्या मानाने किमान ३० टक्के फी वाढ अपेक्षित असताना खाजगी बँकेने मनमानीपणे व्हॅल्युअर्सना विश्वासात न घेता ६० टक्के फी कमी करून व्हॅल्युअर्सना आर्थिक संकटात टाकलेले असणे, करारनाम्यांमध्ये समतोल व परस्पर जबाबदारी असावी लागणे, मराठी भाषेतील अधिकृत व प्रमाणित करार मसुदा उपलब्ध करणे आवश्यक असणे, फी संरचनेबाबत सल्लामसलत करून पुनर्विचार करण्यात येणे आवश्यक असणे, अमर्यादित Indemnity कलमे रद्द करून वाजवी व मर्यादित जबाबदारी निश्चित करणे आवश्यक असणे, व्हॅल्युअर्सना मिळत असलेल्या फीच्या पटीतच जबाबदारी निश्चित व्हावी इत्यादी बाबींवर गंभीर्याने लक्ष देऊन शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(२) **श्री.धीरज लिंगाडे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे (नगरविकास)** लक्ष वेधतील :-

"यवतमाळ नगरपरिषद येथील मुख्याधिकारी यांनी त्यांच्या प्रशासकीय कार्यकाळामध्ये अनेक नियमबाह्य कामे व निर्णय घेतले असल्याचे निर्दशनास येणे, यामध्ये जैवखनन (BIO MINING) प्रकल्प टेंडर प्रक्रिया असो किंवा घनकचरा व्यवस्थापन (घंटागाडी), नाले साफसफाई, अग्निशामक दल विभागीय कार्यालयाचे बांधकाम निविदा अशा अनेक निविदा प्रक्रिया नियमबाह्य प्रक्रियेने राबवून गैरव्यवहार केला असल्याचे निदर्शनास येणे, तसेच महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे अधिकारी यांच्या कक्षेत असलेल्या शहरातील भुयारी गटाराची कामे व शहरात बेंबळा प्रकल्पाचे वाढीव पाणीपुरवठा योजनेची कामे करण्याकरीता शहरांतर्गत भागातील रस्त्यांची खोदकामे करणे, परंतु अनेक ठिकाणी करण्यात आलेल्या खोदकामास २/३ महिन्याचा कालावधी होवून रस्त्याचे काम पूर्ण न करण्यात आल्यामुळे नागरिकांना रहदारीचा त्रास होणे, याबाबत नागरिकांच्या अनेक तक्रारी असणे, शहरासाठी रुपये ९ कोटी विकास निधी प्राप्त झाला असताना ४९ रस्त्यांची काम पूर्ण झाले असल्याचे कागदोपत्री दाखविणे, लोकप्रतिनिधींना विश्वासात न घेता निर्णय घेणे, अशाप्रकारे नगरपालिकेचा कारभार मनमानी पध्दतीने चालविणे, कर्मचारी व पदाधिकारी

यांच्यात समन्वय न ठेवता अयोग्य पध्दतीने कामकाज करणे, निवडून आलेल्या सदस्यांना वेळोवेळी अपमानित करणे, त्यामुळे शासकीय योजना व सार्वजनिक कामांवर विपरीत परिणाम होऊन नागरिकांमध्ये रोष निर्माण झालेला असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(३) **डॉ.मनिषा कायंदे,** सर्वश्री प्रविण दरेकर, प्रसाद लाड, ॲड. निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे, डॉ. परिणय फुके, सर्वश्री सदाशिव खोत, योगेश टिळेकर, सुनिल शिंदे, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **शालेय शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"मुंबईसह महाराष्ट्रात विविध माध्यमांच्या शाळांमध्ये शिकणाऱ्या अल्पवयीन मुला-मुलींवर होणारे अत्याचार दिवसेंदिवस वाढत असणे, अनेक ठिकाणी शाळा परिसर, स्कूल बसेस, कॅन्टीन किंवा वर्गात अत्याचार झाल्याच्या घटना उघडकीस येणे, राज्यात अवैधरित्या सुरू असलेल्या लहान मुलांच्या शाळांची नोंदणी करण्याबाबत शासनाची कोणतीही व्यवस्था नसणे, त्यामुळे अनेक शाळांमध्ये झालेले बालकांवरील अत्याचार उघडकीस न येणे, बदलापूर, मालाडसह अनेक प्रकरणानंतर बाल हक्क आयोगामार्फत चौकश्यांचा सपाटा लावत राज्यातील सर्वच शाळा खोल्यांमध्ये, स्कूलबसमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसवून ICC, POSH सारख्या कमिट्यांचा अनुपालन अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात येणे, मात्र त्यावर कोणत्याही शाळांकडून सकारात्मक प्रतिसाद न मिळणे, अनेक शाळांमध्ये कंत्राटी तत्वावर नेमलेल्या कर्मचाऱ्यांकडून मुली व मुलांवर अत्याचार केल्याचे निदर्शनास येणे, अनेक ठिकाणी शाळांमध्ये घडलेल्या गुन्ह्यांबाबत पालकांकडून अथवा पीडित मुला-मुलींकडून शाळा व्यवस्थापन किंवा मुख्याध्यापकांना सूचना दिल्यानंतर देखील त्यांनी गुन्हा दडपण्याचा प्रयत्न करण्यात येणे, त्यामुळे राज्यातील पालकांमध्ये लहान मुलांच्या शाळांबाबत निर्माण झालेले चिंतेचे वातावरण व अशा प्रकरणांमध्ये गुन्हेगारांसोबतच प्रकरण दाबण्यासाठी मदत करणाऱ्या शाळा व्यवस्थापनांवर तातडीने गुन्हे दाखल करण्यात येऊन संबंधितांवर कठोर कारवाई करण्याची आवश्यकता, अल्पवयीन मुला-मुलींवर शाळांमध्ये होत असलेले अत्याचार रोखण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(४) **श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **ग्रामविकास मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"सोलापूर जिल्ह्यातील अनेक ग्रामीण भागात स्मशानभूमी विषयक अत्यंत गंभीर परिस्थिती असणे, सद्य:स्थितीत सोलापूर जिल्ह्यातील एकूण १७८ गावांमध्ये स्मशानभूमीच उपलब्ध नसून अंत्यसंस्कारासाठी नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असणे, तसेच जिल्ह्यातील अस्तित्वात असलेल्या १२४ स्मशानभूमींमध्ये पिण्याचे पाणी, सुरक्षा भिंत, निवारा शेड,

अंत्यसंस्कार साहित्य, प्रवेश रस्ता इत्यादी मूलभूत सुविधा उपलब्ध नसणे, ग्रामस्थांनी व स्थानिक स्वराज्य संस्थांनी वारंवार निवेदन करूनही संबंधित प्रस्ताव शासनपातळीवर दीर्घकाळ प्रलंबित असणे, स्मशानभूमी हा ग्रामीण समाजाच्या दैनंदिन जीवनातील मूलभूत संरचनात्मक घटक असून त्याअभावी गंभीर सामाजिक व मानवी प्रश्न निर्माण होत असणे, त्यामुळे संबंधित गावातील नागरिकांमधून व्यक्त होत असलेली नाराजी व निर्माण झालेला असंतोष, त्यामुळे या विषयाकडे अत्यंत गांभीर्याने पाहून स्मशानभूमी नसलेल्या १७८ गावांसाठी जागा निश्चित करून त्यास मान्यता देण्याची प्रक्रिया पूर्ण करण्याबरोबरच विद्यमान १२४ स्मशानभूमींमध्ये आवश्यक सुविधा उभारण्यासाठी तातडीने निर्णय घेऊन अंमलबजावणी करण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(५) **श्री.अरुण लाड, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यात सार्वजनिक आरोग्य विभागाच्या नियंत्रणात, अनुदानित व विनाअनुदानित तसेच खाजगी रुग्णालयांत जनसामान्यांच्या आरोग्याला बाधा होईल अशा घटना सर्रास घडत असल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०२६ मध्ये निदर्शनास येणे, शहरी आणि ग्रामीण भागात वैद्यकीय क्षेत्राच्या नावावर अनेक बोगस डॉक्टर सामान्यांची फसवणूक करीत असणे, ग्रामीण भागात आरोग्य केंद्रामध्ये प्रशिक्षित डॉक्टरांचा तुटवडा असणे, हतरु (ता.चिखलदरा, जि.अमरावती) येथे डॉक्टरांअभावी आरोग्य केंद्राच्या वऱ्हांड्यातच महिलेची प्रसूती होणे, मुंबईतील अंधेरी येथील सिद्धी नर्सिंग होममध्ये वॉर्डबॉयने डॉक्टर असल्याचे भासवून, आर्थिक फसवणूक करून चुकीचे इंजेक्शन दिल्याने वाशीतील तरुणीचा मृत्यू होणे, तसेच महालक्ष्मीनगर, अंबरनाथ येथील दवाखान्यात एका सहा वर्षांच्या चिमुकल्याला सर्दी-खोकल्यावरील उपचारासाठी नेले असता सलाईनमधून चुकीचे इंजेक्शन दिल्याने त्याची प्रकृती खालावून दुर्देवी मृत्यू होणे, वैद्यकीय क्षेत्राची पदवी मिळविल्यानंतर देखील डॉक्टरांकडून होणारे लाजिरवाणे कृत्य, यामुळे या क्षेत्राबाबत असणारी विश्वासार्हता संपुष्टात येणे, दोषी आरोग्य सेवकांचे प्रमाणपत्र रद्द करणे, तसेच राज्यातील बोगस डॉक्टरांवर शासनाकडून कठोर कारवाई करण्यात होत असलेले दुर्लक्ष, विविध परिसरांत अशा घटनांमुळे पसरलेले तणावाचे वातावरण, नागरिकांमध्ये शासनाप्रती पसरलेला तीव्र असंतोष, वैद्यकीय क्षेत्रासंबंधी नागरिकांमध्ये सजगता, सावधता निर्माण होण्यासाठी शासनाने विविध उपक्रम राबविण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**सहा : म.वि.प. नियम १०१ — अ अन्वये विशेष उल्लेख — (असल्यास)**

**सात : म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा—**

**श्री. योगेश टिळेकर,** ॲड. निरंजन डावखरे, श्री. प्रविण दरेकर, **वि.प.स. यांची म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा —**

"पुणे शहरातील गुंठेवारी कायद्यांतर्गत घरे नियमित करण्यासाठी सन २००१ पर्यंतची असलेली मुदत वाढविण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतल्याने दिनांक ३१ डिसेंबर २०२० पर्यंतची घरे या कायद्यान्वये नियमित करण्याचा मार्ग मोकळा झाला असणे, ही घरे नियमित करण्यासाठीचे शुल्क राज्य सरकारकडून निश्चित करून देण्यात येणे, तसेच त्याला 'युनिफाईड डीसी रूल' आणि 'रेडी-रेनकरची' जोड दिल्याने घरे नियमित करण्यासाठी भरमसाट शुल्क नागरिकांना भरावे लागत असणे, आजपर्यंत १०१२ अर्ज महानगरपालिकेकडे दाखल असून फक्त ३५ प्रकरणात गुंठेवारी मंजूर होणे, प्रकरण दाखल करताना मोजणी करणे आणि विमान प्राधिकरणाचा दाखला या अटी जाचक असणे, त्याचप्रमाणे गुंठेवारी करताना एका गुंठा नियमित करण्यासाठी साधारण रुपये १५ लाख खर्च येणे, त्यामुळे गुंठेवारी करण्यासाठी नागरिकांना अडचणीचे होत असणे, यासाठी महानगरपालिकेचे उत्पन्न वाढविण्यासाठी व नागरिकांना गुंठेवारी सुलभपणे करण्यासाठी मोजणी करणे आणि विमान प्राधिकरणाचा दाखला या जाचक अटी शिथिल करून गुंठेवारीसाठी येणाऱ्या भरमसाठ खर्चामध्ये कपात केली तर नागरिकांचा गुंठेवारी करण्याकडे कल वाढणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**आठ : शासकीय विधेयके —**

**विधानसभेने संमत केल्याप्रमाणे — विचार, खंडश: विचार व संमत करणे:-**

**(१)** सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७ - महाराष्ट्र उद्‌वाहने, सरकते जिने व सरकते मार्ग (सुधारणा) विधेयक, २०२६

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री सतेज उर्फ बंटी पाटील, ॲड.अनिल परब, सर्वश्री शशिकांत शिंदे, अभिजित वंजारी, सचिन अहिर, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७ - महाराष्ट्र उद्‌वाहने, सरकते जिने व सरकते मार्ग (सुधारणा) विधेयक, २०२६" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे.

---

**(२)** सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९ - महाराष्ट्र मुद्रांक (सुधारणा) विधेयक, २०२६

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री सतेज उर्फ बंटी पाटील, ॲड.अनिल परब, सर्वश्री शशिकांत शिंदे, अभिजित वंजारी, सचिन अहिर, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९ - महाराष्ट्र मुद्रांक (सुधारणा) विधेयक, २०२६" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे.

---------------------------------------------------------------------------

**नऊ : (क)** **श्री. सतेज उर्फ बंटी पाटील,** ॲड. अनिल परब, सर्वश्री शशिकांत शिंदे, अशोक ऊर्फ भाई जगताप, सुनिल शिंदे, एकनाथराव खडसे, अभिजित वंजारी, सचिन अहिर, अरुण लाड, राजेश राठोड, जगन्नाथ अभ्यंकर, जयंत आसगावकर, मिलिंद नार्वेकर, धीरज लिंगाडे, सुधाकर अडबाले, **म.वि.प. यांचा नियम २६० अन्वये प्रस्ताव —**

"इराण, इस्त्रायल आणि अमेरिका यांच्यात सुरु असलेले युध्द, या युध्दजन्य परिस्थितीमुळे राज्यात अत्यावश्यक वस्तू तसेच सर्वसामान्य जनतेशी निगडीत असलेले पेट्रोल, डिझेल, वाणिज्य गॅस यांचा निर्माण झालेला तुटवडा, यामुळे सर्वसामान्य नागरिकांचे हाल होत असणे, या वस्तूंचा होत असलेला काळाबाजार तसेच शेतीशी संबंधित केळी, कांदा व द्राक्ष इत्यादी निर्यात मालाचे कंटनेर बंदरात पडून असणे, या नाशवंत मालामुळे शेतकऱ्यांच्या बाजारात येणाऱ्या मालाला कवडी मोलाचा भाव मिळणे, परिणामी शेतकऱ्यांना उत्पादन खर्चही मिळत नसल्याने शेतकरी उध्वस्त होणाच्या मार्गावर असणे, युध्दजन्य परिस्थितीमुळे परदेशात अडकलेले राज्याचे नोकरदार व पर्यटक यांच्यासंदर्भात करावयाची उपाययोजना, राज्यात कामगार संहिता लागू केली असून या चार संहिता स्वीकारल्यामुळे कामगारांमध्ये संभ्रम निर्माण झाला असणे, या कायद्याची अंमलबजावणी सुरु करण्यापूर्वी सभागृहाचे विरोधी पक्षातील सदस्य व कामगार नेते यांच्यासह काही सदस्यांची समिती नियुक्त करुन या विषयावर सर्वंकष विचारविनिमय करणे, आरोग्य विभागात औषध खरेदी, औषध पुरवठ्यातील घोटाळे आणि डॉक्टरांची अनुपस्थिती यासारख्या गंभीर अनियमितता आढळल्याने राज्यात आरोग्य व्यवस्थेचा बोजवारा उडालेला असणे, याबाबत शासनाची प्रतिक्रिया तसेच करावयाची उपाययोजना व कार्यवाही."

**(ख)** **(मंगळवार, दिनांक १० मार्च, २०२६ व बुधवार, दिनांक ११ मार्च, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला प्रलंबित**

**म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव) —**

**सर्वश्री प्रविण दरेकर,** हेमंत पाटील, विक्रम काळे, प्रसाद लाड, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री. सतिश चव्हाण, ॲड. निरंजन डावखरे, श्रीमती भावना गवळी, श्री. संजय खोडके, श्रीमती चित्रा वाघ, सर्वश्री कृपाल तुमाने, अमोल मिटकरी, श्रीकांत भारतीय, किशोर दराडे, शिवाजीराव गर्जे, सदाशिव खोत, चंद्रकांत रघुवंशी, डॉ. परिणय फुके, सर्वश्री इद्रिस नायकवडी, अमरिशभाई पटेल, पंकज भुजबळ, श्रीमती उमा खापरे, सर्वश्री अमित गोरखे, विक्रांत पाटील, दादाराव केचे, संदीप जोशी, योगेश टिळेकर, संजय केणेकर, रणजितसिंह मोहिते-पाटील, राजहंस सिंह, वसंत खंडेलवाल, ज्ञानेश्वर म्हात्रे, धर्मगुरू बाबूसिंग राठोड, **म.वि.प. यांचा नियम २६० अन्वये प्रस्ताव —**

"दावोस मध्ये आयोजित वर्ल्ड इकॉनॉमिक फोरममध्ये राज्याच्या मुख्यमंत्री महोदयांच्या नेतृत्वात ३० लाख कोटी रुपयांच्या गुंतवणूकीचे झालेले करार व तत्कालीन उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्री यांचे आर्थिक नियोजन व योगदान, उप मुख्यमंत्री (नगरविकास व गृहनिर्माण) यांची दूरदृष्टी यामुळे महाराष्ट्र 'गुंतवणूकीचे पावरहाऊस' झाले असणे, १८ देशांमधून थेट परकीय गुंतवणूक राज्यात येणार असणे, टाटांसोबत देशातील पहिली इनोव्हेशन सिटी मुंबईजवळ तयार करण्याचे प्रयोजन असणे, रायगड-पेण ग्रोथ सेंटरची घोषणा करण्यात आली असल्याने यात रुपये १ लाख कोटींची गुंतवणूक अपेक्षित असणे, राज्यातील एकूण गुंतवणूकीमधून ४० लाख रोजगार निर्मितीचे उद्दीष्ट साध्य होणार असणे, छत्रपती संभाजीनगर महाराष्ट्राचे दुसरे ऑटोमोबाईल हब होणार असणे, कृत्रिम बुध्दीमत्तेच्या क्षेत्रात जागतिक महासत्ता असलेल्या एनव्हीडियाशी झालेली चर्चा महाराष्ट्राला डिजिटल कॅपिटल बनविण्याचे पाऊल असणे, कोकणात पर्यटनासोबतच 'लॉजिस्टिक हब' म्हणून कोकणची नवीन ओळख होणार असणे, राज्यात होणाऱ्या हवामान बदलास कोळसा, पेट्रोल, डिझेल अशा जीवाश्म इंधनापासूनची ऊर्जा निर्मिती कारण असणे, सर्व जिल्हयांसाठी आणि शहरांसाठी वातावरणीय कृती आराखडे तयार करण्यात येत असणे, राज्य प्रदूषणमुक्त करण्याकरिता विद्युत वाहन धोरण जाहिर करुन विद्युत वाहनधारकांना टोलमुक्त करण्यात येणे, मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली पर्यावरण व शाश्वत विकास टास्क फोर्स गठीत करण्यात आला असणे, "माझी वसुंधरा अभियान" राबविण्यासाठी पर्यावरण व वातावरणीय विभागाकडून देवराई फाऊंडेशन, पुणे या संस्थेसोबत सामंजस्य करार करण्यात येणे, औद्योगिक क्षेत्रात परकीय गुंतवणूक व कृत्रिम बुध्दीमत्तेच्या माध्यमातून रोजगार निर्मिती करण्याकरिता आणि पर्यावरणपूरक वातावरण निर्मिती करण्याकडे होत असलेली वाटचाल अधिक गतीमान करण्यासाठी करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**दहा : अर्धा-तास चर्चा म.वि.प. नियम ९२ अन्वये (बैठकीच्या शेवटी)**

**(१) सर्वश्री अशोक जगताप, सतेज पाटील, अभिजित वंजारी, वि.प.स पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"राज्यात विवाहप्रसंगी हुंडा घेणे हा कायद्याने दंडनीय गुन्हा असणे, तथापि, प्रत्यक्षात ग्रामीण भागातील गावे व तांडे तसेच शहरी भागामध्येही रोख रक्कम, सोन्याचे दागिने, दुचाकी किंवा चारचाकी वाहने इत्यादी स्वरूपात हुंडा देणे-घेणे सुरू असल्याचे दिसून येत असणे, या प्रथेमुळे प्रत्येक मुलीच्या पालकांना त्यांच्या मुलींच्या विवाहासाठी मोठ्या प्रमाणावर आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत असणे, अनेक वेळा विवाहाचा संपूर्ण खर्चही मुलीच्या पालकांनाच करावा लागत असल्याचे आढळून येणे, परिणामी या सामाजिक प्रथेमुळे आर्थिक ताण सहन न झाल्याने काही मुलींच्या पालकांनी आत्महत्या केल्याची उदाहरणेही आढळून येत असणे, तसेच पालकांचे होणारे दुःख आणि आर्थिक ताण पाहून काही मुलीही आत्महत्येसारखा अत्यंत दुर्दैवी निर्णय घेत असणे, या पार्श्वभूमीवर हुंडा प्रतिबंधक कायद्यातील तरतुदींची प्रभावी व परिणामकारक अंमलबजावणी करणे तसेच या प्रथेविरोधात व्यापक जनजागृती करणे अत्यंत आवश्यक असणे, मात्र याबाबत शासनाकडून अपेक्षित प्रभावी कार्यवाही होत नसल्याची भावना जनतेमध्ये व्यक्त होत असून त्यातून नाराजी व असंतोष निर्माण होत असल्याचे दिसून येत असणे, या पार्श्वभूमीवर राज्यात हुंडा प्रतिबंधक कायद्याची काटेकोर अंमलबजावणी करण्यासाठी तसेच या प्रथेविरोधात व्यापक जनजागृती करण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(२) सर्वश्री विक्रांत पाटील, प्रसाद लाड, श्रीमती उमा खापरे, वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"राज्यातील अनेक युवक बेरोजगारीमुळे नैराश्यपूर्ण जीवन जगत असणे, युवकांच्या सर्वांगीण कल्याणासाठी तसेच त्यांना आवश्यक समुपदेशन व मार्गदर्शन मिळावे यासाठी राज्यस्तरावर “महाराष्ट्र राज्य युवा कल्याण आयोग” अथवा तत्सम प्राधिकरण स्थापन करण्याची आवश्यकता निर्माण झाली असणे, अनेक युवकांना योग्य वयात योग्य मार्गदर्शन व आर्थिक पाठबळ मिळत नसल्यामुळे ते दिवसेंदिवस दिशाहीन होत असल्याचे दिसून येत असणे, याशिवाय, शिक्षणाच्या पात्रतेनुसार रोजगाराच्या संधी अत्यल्प प्रमाणात उपलब्ध असणे, युवकांसाठी शासनाच्या विविध विभागांमार्फत अनेक योजना राबविण्यात येत असून त्या योजनांच्या अंमलबजावणीत आवश्यक समन्वयाचा अभाव असल्यामुळे अनेक युवकांना शासनाच्या योजनांचा लाभ घेताना विविध अडचणींचा सामना करावा लागत असणे, तसेच परदेशात शिक्षण घेण्यासाठी किंवा नोकरी करण्यासाठी युवकांना वेळोवेळी योग्य मार्गदर्शन मिळणे आवश्यक असणे, प्रत्येक जिल्ह्यातील पुढील दहा वर्षांमध्ये अपेक्षित असलेल्या प्रकल्पांचा विचार करून त्यानुसार युवकांना आवश्यक

कौशल्य प्रशिक्षण उपलब्ध करून देण्याची गरज असणे, दहावी, बारावी किंवा पदवी शिक्षण पूर्ण केल्यानंतर पुढे कोणता मार्ग निवडावा याबाबत अनेक युवकांच्या मनात संभ्रम निर्माण होत असणे, काही युवक उदरनिर्वाहासाठी योग्य साधन उपलब्ध न झाल्यामुळे व्यसनाधीनतेकडे आकर्षित होत असल्याचे दिसून येत असणे, परिणामी गुन्हेगारीचे प्रमाण वाढण्याची शक्यता निर्माण होत असणे, युवकांच्या कल्याणासाठी शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजना व उपक्रम प्रभावीपणे त्यांच्यापर्यंत पोहोचविण्यात अपयश येत असल्यामुळे युवकांमध्ये शासनाविषयी असंतोषाची भावना निर्माण होत असून शासनावरील विश्वासही काही प्रमाणात कमी होत असल्याचे दिसून येत असणे, या पार्श्वभूमीवर युवकांना आपले प्रश्न मांडण्यासाठी योग्य व्यासपीठ उपलब्ध व्हावे, त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक मार्गदर्शन व सहाय्य मिळावे तसेच विविध योजनांमध्ये समन्वय साधला जावा यासाठी कौशल्य विकास विभागाच्या अंतर्गत “महाराष्ट्र राज्य युवा आर्थिक कल्याण आयोग” अथवा तत्सम प्राधिकरण स्थापन करण्याची मागणी होत असणे, याबाबत युवकांच्या हितासाठी, कल्याणासाठी आणि त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक : ११ मार्च, २०२६.

**डॉ. विलास आठवले**,
सचिव-३,
महाराष्ट्र विधानपरिषद.